

तुलादानविधि

ग. ह. खरे

अनुक्रमणी



श्री. के. ग. ऊर्फ **बाबूराव जोशी** ज्ञानसागर लिथो प्रेसचे धनी यांच्या औदार्यानें हें पुस्तक छापलें गेलें म्हणून त्यांसच हें अर्पण केलें आहे.



श्री. के. ग. ऊर्फ **बाबूराव जोशी** ज्ञानसागर लिथो प्रेसचे धनी यांच्या रौप्यतुलेचें एक दृश्य

तुळादानविधि

(तात्त्विक वर्णन व ऐतिहासिक निर्देश)

गणेश हरि खरे

क्यूरेटर : भा. इ. सं. मंडळ, पुणें.

श. १८६९] मूल्य ८ आणे [इ. १९४८

माझी वाङ्मयसेवा

१,२ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ (अंशतः) –इ. १९३०–मू. ७ रु.

३ मंडळांतील नाणीं –इ. १९३३–मू. १ रु.

४,५ शिवचरित्र साहित्य खंड ३ (अंशतः) व ६ (पूर्णतः) –इ. १९३०, ३७–मू. ३ व १॥ रु.

६–८ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ ते ३ –इ. १९३४, ३७, ३९–मू. प्रत्येकीं १॥ रु.

९–११ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ व २, ३ रा चालू –इ. १९३०, ३४–मू. १॥ व २ रु.

१२,१३ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ व ३ (फार्सी साधनांचे अनुवाद) –इ. १९३९, ४१–मू. प्रत्येकीं १॥ रु.

१४,१५ हिंगणें दफ्तर खंड १ व २ –इ. १९४४, ४७–मू. प्रत्येकीं ३ रु.

१६ भोर संस्थान ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयप्रदर्शिका –इ. १९३५–मू. ८ आ.

१७ भोर संस्थान ऐतिहासिक स्थलदर्शन –इ. १९४५–मू. ८ आ.

१८ ऐतिहासिक आख्यायिका –इ. १९४४–मू. ४ आ.

१९ पंढरपूरचा विठोबा –इ. १९४७–मू. ४ आ.

२० लाठी शिक्षक भाग १ –इ. १९२८–मू. २ आ.

२१ श्रीक्षेत्र आळंदी –इ. १९३१–मू. २ आ.

२२ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर –इ. १९३८–मू. ६ आ.

२३ मूर्तिविज्ञान –इ. १९३९–मू. ५ रु.

२४ संशोधकाचा मित्र (छापीत आहे) –इ. १९४८–मू. ५ रु.

२५ Simhagadh –इ. १९४८–मू. ४ आ.

२६ तुलादानविधि –इ. १९४८–मू. ८ आ.

निवेदन

सांगली येथील प्रख्यात श्रीगजानन वीव्हिंग मिल्सचे धनी श्री. विष्णु रामचंद्र वेलणकर यांचे मनांत स्वतःची सुवर्णतुला करावी अर्थात् तुलेचें द्रव्य दान करावें अशी सुवासना उत्पन्न झाली. असें कार्य सध्यां क्वचित् होत असल्यानें या कार्याची ऐतिहासिक माहिती एकत्र केल्यास उत्तम असें त्यांना वाटलें. तो हेतू त्यांनीं केसरी व सह्याद्रि या नियतकालिकांचे तत्कालीन संपादक श्री. दा. वि. गोखले व श्री. दि. वि. काळे यांस कळवून त्यासाठीं कांहीं द्रव्यसाह्यही केलें. उपर्युक्त संपादकद्वयानें तें काम मजवर सोंपविलें व मी तें यथाशक्ति पार पाडिलें.

अशा तऱ्हेनें पुस्तकाचा मुख्य भाग नोव्हेंबर १९४६ च्या अखेरीसच तयार झाला. तरी त्या तुलाप्रसंगीं (१९।१।४७) त्याचें प्रकाशन होऊं शकलें नाहीं. नंतर गेल्या वर्षभर मी, स्वतःस किंवा माझ्या मित्रांस आढळलेल्या तुलांचे निर्देशांची भर यांत घालीत राहिलों. पण पुस्तक केव्हां व कसें प्रकाशित व्हावें याची माझी चिंता कधींच सुटली नव्हती. तो योग अचानक आला. गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या २३ तारखेस मुंबई येथें श्री. के. ग. उर्फ बाबूराव जोशी यांची तुला झाल्याचें वर्तमानपत्रांत वाचतांच त्यांस व त्यांचा परिचय नसल्यानें इतर परिचितांस मी तयार केलेल्या पुस्तकाची माहिती कळवून पुस्तकाच्या प्रकाशनास साह्य करण्याविषयीं विनविलें. फलतः प्रकाशनाचा सर्वच खर्च श्री. जोशी यांनीं देण्याचें ठरविल्यानें माझी चिंता दूर झाली. तसेंच श्री. रा. ज. देशमूख यांनीं प्रकाशक बनण्याचें मान्य केलें. याबद्दल मी येथें निर्दिष्ट व अनिर्दिष्ट अशा सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

एखाद्या विशिष्ट मुद्यापुरती माहिती एकत्र करणें किती प्रयासाचें असतें हें संशोधकास तरी सांगावयास नको. इतरांना मात्र त्याची नीटशी कल्पना नसते. इंग्रजी पुस्तकांना सामान्यतः सूच्या असतात तर मराठी पुस्तकांना बहुधा नसतात. आणि असल्या तरी त्यांत तुलादानासारखा विषय नोंदलेला असतो असें नाहीं. अशा स्थितींत मी जमविलेले उल्लेख कितीही कष्ट पडले असले तरी निःशेष झाले अशी ग्वाही देतां येणार नाहीं; पण बहुतेक उल्लेख एकत्र आले असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकदां एखाद्या मुद्यावर बरेच दिवस संशोधन केलें म्हणजे तो मुद्दा बहुधा संशोधकाच्या डोक्यांतून जात नाहीं. संशोधक निमित्त संपलें तरी माहिती गोळा करीत राहतो. त्याप्रमाणें यापुढें जी माहिती एकत्र होईल ती या पुस्तिकेच्या पुढील आवृत्तीत समाविष्ट करतां येईल.

या पुस्तकाविषयीं सांगण्यासारखें होतें तें वर सांगितलें. आतां मूर्तिविज्ञान पुस्तक इ. १९३९ मध्यें प्रकाशित झाल्यानंतर मीं काय केलें तें येथें थोडक्यांत नमूद करतों. त्या पुस्तकांत शिल्परहस्य व संशोधकाचा मित्र या दोन पुस्तकांविषयीं माझा संकल्प मीं व्यक्त केला. त्याप्रमाणें दोन्ही पुस्तकांस आवश्यक ती माहिती जमवीत राहिलों. त्यासाठीं स्वतःच्या व कै. बाबासाहेब इचलकरंजीकर यांच्या द्रव्यबलावर व मंडळाच्या सहानुभूतीनें सुमारें चार महिने हिंडून हिंदुस्थानांतील बहुतेक म्यूझियमें व पुराणवस्त्ववशेष यांचा अभ्यास केला. शेकडों चित्रें, फोटो व अमूल्य अशी माहिती एकत्र केली. पण 'संशोधकाचा मित्र' चटकन् हातावेगळा करतां येईल' या भावनेनें त्यावर लक्ष केंद्रित केलें. प्रयत्न करून कागद, प्रकाशनाचा कोटा व द्रव्य जमविलें; १६० पानें छापून झालीं; १४० पानें व्हावयाचीं आहेत; ग्रंथप्रकाशनास मदत म्हणून १३०० रुपये रोख मिळाले; ३०० रुपये नियमानुसार ग्रंथप्रकाशनानंतर मिळावयाचे आहेत; ते मिळतील याविषयीं शंका नाहीं. वास्तविक या दोन पुस्तकांच्या प्रकाशनास इतका उशीर व्हावयास नको होता. पण एक तर मध्यंतरीं मंडळाच्या तर्फेनें केलेलें संशोधन व प्रकाशन यांत पुष्कळ खाजगीही वेळ गेला. शिवाय इंग्रजी-मराठी स्फूट लेख लिहिण्यानें अधिक उच्च ज्ञानोपासना व जनसेवा होते अशीही समजूत होऊन स्फूट लेख लिहिले. या दोन्ही कारणांनीं उपर्युक्त पुस्तकप्रकाशन मागें पडलें. पण अकरा इतर पुस्तक-पुस्तिका आणि पंचाहत्तर इंग्रजी-मराठी (३४+४१) लेख तयार व बहुतेक प्रकाशित झाले. आतां लेख न लिहितां पुस्तकेंच लिहावीं असें मनानें घेतलें आहे. आतांपर्यंत प्रकाशित केलेले लेख व ग्रंथ बव्हंशीं साधनांचा आविष्कार करणारे आहेत. पण यापुढें माझ्या हातून मुख्यतः संकलनात्मक काम होणार असें दिसतें. पैकीं सुधारून वाढविलेला फार्सी-मराठी कोश आणि मराठ्यांच्या इतिहासाची विस्तृत शकावली हीं दोन अर्धसंकलनात्मक कामें वाट चालूं लागलीं आहेत. पहिल्याच्या प्रकाशनाकरितां मदतीचें आश्वासन आहे, तर दुसऱ्याच्या तयारीसाठीं मुंबई युनिव्हर्सिटीनें चारशें रुपयांची देणगी दिली आहे. अशा तऱ्हेनें दोन्ही कार्यांना आरंभ तर चांगला झाला आहे आणि खात्री आहे कीं, तुम्हा सर्वांच्या रूपेनें आवश्यक तें द्रव्यबल व मनुष्यबल मिळून उपर्युक्त सेवा मजकडून उचित प्रकारें होईल.

रामनवमी श. १८६९ **गणेश हरि खरे.**

तुलादानविधि

१ तात्त्विक स्वरूप *

विशिष्ट जातीच्या दानांस महादानें अशी संज्ञा आहे. अग्निपुराणांत एके ठिकाणीं हीं सोनें, घोडा, तिल, हत्ती, दासी, रथ, भूमि, घर, कन्या व कपिला गाय अशीं दहा सांगितलीं असलीं तरी हीं सामान्यतः तुलापुरुष, हिरण्यगर्भ, ब्रह्मांड, कल्पवृक्ष, गोसहस्र, कामधेनु किंवा हिरण्यकामधेनु, हिरण्याश्व, हिरण्याश्वरथ अथवा अश्वरथ, हेमहस्तिरथ अगर हस्तिरथ, पंचलांगल, हैमधरा किंवा धरा, विश्वचक्र, कल्पलता किंवा महाकल्पलता, सप्तसागर, रत्नधेनु, महाभूतघट, अशीं सोळा समजलीं जातात. लिंगपुराणांत दिलेली यादी याहून थोडी निराळी असली तरी हेमाद्रि, दानमयूख, दानसागर वगैरे ग्रंथांत याच दानांचें परिगणन केलें आहे. या सोळा महादानांपैकीं पहिल्या दानास तुला, तुलाभार, तुलापुरुष, तुलारोह-धिरोह इत्यादि नांवें आहेत.

हें दान कोणीं, कोठें, केव्हां व कसें करावें याविषयीं अग्नि, गरुड, भविष्योत्तर, मत्स्य, लिंग, विष्णुधर्मोत्तर इत्यादि पुराणांत, तें एक महादान असल्यामुळें दानसागर, दानचंद्रिका, दानमयूख, दानकल्पद्रुम, इत्यादि दानांवरील प्रमाणभूत ग्रंथांत व अपरार्काच्या याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीकेंत कांहींना कांहीं माहिती आली आहे. यांतील बहुतेक ग्रंथ सर्वप्रसिद्ध असल्यानें त्यांविषयीं अधिक सांगण्याची जरूरी नाहीं. पण कित्येक पुस्तिका केवळ याच विषयास वाहिलेल्या आहेत. यामुळें त्यांचा निदान नामनिर्देश करणें अगदीं आवश्यक आहे. अशा पुस्तिका म्हणजे सिद्धनाथाचें तुलादानप्रकरण, नारायणाचा तुलादानविधि, कमला-

---

* या प्रकरणांत आलेली माहिती महामहोपाध्याय पां. वा. काणे यांचें ' हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र ' खंड २, भाग २, पृ. ८६९-८७२, हेमाद्रीचा, ' चतुर्वर्गचिंतामणि ' दानखंड, पांचवें प्रकरण (बनारस प्रत), पृ. १७५-२२५, आफ्रेक्टचा ' कॅटलॉगस कॅटलॉगोरम ' इ. ग्रंथांतरून संकलित केली आहे.

कराचा तुलादानप्रयोग, विठ्ठलाचा तुलापुरुषदानप्रयोग, गोपीनाथाची तुलापुरुषमहादानपद्धति, नारायणभट्टाचा तुलापुरुषमहादानप्रयोग, इत्यादि होत. याशिवाय ज्यांच्या कर्त्यांचीं नांवें माहीत नाहींत पण ज्यांत तुलादानाची माहिती आहे असे पद्धति, विधि, प्रयोग, माहात्म्य या नांवांनीं ओळखले जाणारे ग्रंथ आहेत.

हे सर्व ग्रंथ एकत्र पहावयास मिळणें अतिशय कठीण आहे. पण सामान्यतः येवढें म्हणतां येईल कीं, या ग्रंथांपैकीं मयूखादि अर्वाचीन ग्रंथांस मुख्यतः हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणि या प्राचीन ग्रंथाचा आणि हेमाद्रि, अपरार्क इत्यादिकांस मुख्यतः प्राचीनतर पुराणादि ग्रंथांचा आधार आहे. उ. हेमाद्रीनें (इ. १३००) आपल्या या महादानाच्या विवरणांत आठ महा व उपपुराणें, दोन ब्राह्मणग्रंथ व एक आगमग्रंथ यांचा उपयोग केला आहे, तर अपरार्कानें (इ. १२००) आपल्या विवरणांत केवळ मत्स्य व भविष्योत्तर या दोन पुराणांचा आधार घेतला आहे.

पुराणांचा निश्चित काल सांगणें अशक्यच आहे. परंतु सामान्यतः असें म्हणतां येतें कीं, मत्स्य, विष्णुधर्मोत्तर इत्यादि पुराणें सातव्या शतकामध्यें सध्याच्या रूपांनीं अस्तित्वांत आलीं आणि मत्स्याचें मूळ रूप तर इसवी सनाच्या आरंभींही बनत आलें होतें; तेव्हां तात्त्विक वाङ्मयात्मक पुराव्यांवरून या महादानाचें आस्तित्व सातव्या शतकांत होतें असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. पण पुढें तुलादानांचे उल्लेख दिले आहेत त्यांवरून याच्या आस्तित्वाचा काळ आणखीहि मागें जातो. उ. शिलप्पादिकारम् मधील प्रसंग खरोखरीच इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत झाला असेल तर या दानाचा काळ त्या शतकापर्यंत जाऊन पोहोंचतो. महादानांत कल्पवृक्ष हें क्रमानें तिसरें असून त्याचा उल्लेख खारवेलाच्या हातीगुंफा लेखांत आला आहे. खारवेलाचा काल इ. सनपूर्व दुसरें शतक हा असल्यानें त्या दानाचें अस्तित्वही त्या शतकांत होतें हें सिद्ध झालें. महादानांच्या परिगणनांतील क्रम हेतुपुरःसर व आनुपूर्वीयुक्त आहे असें मानलें तर तुलादान हें आद्य महादान असल्यामुळें त्याचा काल कल्पवृक्ष महादानाच्याही पूर्वीचा ठरतो. किती हें अर्थात् आज निश्चयानें सांगतां येत नसलें तरी कल्पवृक्षाचा काल इ. सनापूर्वी दुसरें शतक आहे तर तुलादानाच्या अस्तित्वाचा काल इ. सनापूर्वी तिसरें शतक धरण्यास हरकत नाहीं.

मी या तुलादानप्रकरणीं जे ग्रंथ पाहिले त्या सर्वांत हेमाद्रीनें दिलेली माहिती सर्वाधिक तपशीलवार आहे. तीमध्यें साधारणपणें पुढील विषय आले आहेत. तुला-

पुरुषादि सोळा महादानांचीं नांवें, २ प्राचीनकालीं हीं ज्यांनीं केलीं त्या राजांचीं नांवें, ३ हीं करण्यास योग्य काल, स्थानें व निमित्तें, ४ तुलादिनाच्या पूर्व दिवशीं करावयाचा विधि, ५ मंडपरचना, ६ तुलावेदीची बांधणी, ७ तुलातोरणाची उभारणी, ८ तुलेची घडण, ९ वेदीच्या भोंवतीं कुंडसिद्धि व देवतास्थापना, १० तुलादंडावरलि देवतांचीं रूपें, ११ तलाविधीसाठीं आवश्यक असे ब्राह्मण, गुरु व पुरोहीत, १२ होमामध्यें त्यांनीं कोणते विधि कसे करावयाचे, १३ होमाचे अंतीं दश-दिक्पालांना आवाहन, १४ मुख्य दिवशीं करावयाचे विधि, १५ तुलेची स्तुति, १६ तुलारोहणविधि, १७ अग्निपुराणमताचा तुलारोहणविधि, १८ तुलाद्रव्यदानविधि, १९ तुलादानाचें फल, २० लिंगपुराण व कामिकागम यांच्या मतानें तुलाधराहण विधि, २१ तदंगभूत शिवसहस्रनाम, २२ विष्णुधर्मोत्तरपुराणोक्त घृतादि तुलापुरुषदानविधि, २३ रूप्यादिं तुलापुरुषविधि, २४ गरुडपुराणोक्त नानारोगघ्न तुलापुरुषदानाविधि, २५ स्कंदपुराणोक्त तुलापुरुषदानविधि.

वरील विषयसूची व प्रकरणावलोकन यांवरून दिसून येईल कीं, हेमाद्रीनें आपलें तुलापुरुषदान हें प्रकरण तयार करतांना अग्नि, गरुड, मत्स्य, लिंग, विष्णुधर्मोत्तर, पद्म, देवी व स्कंद या पुराणांचा सपाटून उपयोग केला असून शिवाय आथर्वण व गोपथ ब्राह्मणें, कामिक आगम, आपस्तंबसूत्र, इत्यादि ग्रंथांचाही कार्याकारण तुलांगभूत एखादा विधि वर्णन करतांना आधार घेतला आहे. अर्थात् या ग्रंथांत तुलादानप्रकरण आलें असेलच असें सांगतां येत नाहीं. उलट कामिकागमाशिवाय इतरत्र तें बहुधा आलें नसावें. कामिकागमाविषयीं निश्चय नाहीं.

हेमाद्रीनें लिहिलेल्या तुलादान प्रकरणांतील कांहीं विषयांची येथें अधिक माहिती व त्यावर चर्चा केली पाहिजे असें वाटतें. (१) हें तुलादान केल्याविषयीं पुढें जे उल्लेख दिले आहेत त्यांत बहुतेक ठिकाणीं पुरुष व राजे किंवा राजकल्पव्यक्ति असल्या तरी स्त्रिया व राजपुरुषेतर व्यक्ति यांची तुला करण्यास धर्मशास्त्राचा विरोध नाहीं. तुलादान करण्या इतकें द्रव्य मुख्यतः राज्यांपाशीं असणें सहज शक्य असल्यानें व त्यांनीं केलेले विधि लेखनिविष्ट झाल्यानें त्यांनीं हा विधि केल्याचे पुरावे पुष्कळ सांपडतात इतकेंच. (२) तुलेकरितां उभारावयाचें तोरण लाकडी असावें असें धर्मशास्त्रांत सांगितलें असलें तरी विजयनगर सम्राटांनीं व त्रावणकोरच्या राजांनीं वारंवार तुला करण्यास सोईचें जावें म्हणून कायमचीं दगडी तोरणें उभारलेलीं होतीं

आणि तुलादान हें षोडश महादानांपैकीं आद्य दान असल्यानें त्याचें शिल्पही क्वचित् कुंभकोणम् सारख्या ठिकाणीं कोरलें गेलें. (३) तुलारोहण सवस्त्र, सायुध व सालंकार करावें असें सर्वत्र सांगितलें आहे. यामुळें तुलेचें वजन समजलें तरी तुलारोहण करणाऱ्या व्यक्तीच्या अंगयष्टीचें निश्चित वजन कळत नाहीं. अंदाजीं कळतें. (४) मिळालेले तुलोल्लेख बहुतांशीं सोन्याच्या तुळेचे असले तरी धर्मशास्त्रानें सप्त धातू, पंचामृतें, तेल, वस्त्र, मीठ, गूळ, चंदन, सुगंधि द्रव्यें, कुंकू, फुलें, पीठ, अन्न, विडा, इत्यादि वस्तूंच्या तुला करण्यास मुभा दिली आहे. एवढेंच नव्हे तर विविध पदार्थांच्या तुलेनें कोणतीं फळें मिळतात हें नमूद करून कोणत्या देवता संतुष्ट होतात हेंही कथन केलें आहे. (५) तोललेलें द्रव्य कोणास द्यावें याविषयीं एकच सूत्र आहे. ज्यांस द्यावयाचें ते सत्पात्र, दीन, अनाथ, पंगू, गरजू असे असले म्हणजे झालें.

२ शिल्पें

तुलादानाचीं दोन शिल्पें सर्वज्ञात आहेत. पैकीं एका शिल्पांतील फक्त दगडी तिरकट किंवा तोरण काय तें शिल्लक राहिलें असून त्यास राजतुला म्हणण्याचा प्रघात आहे. ही तिरकट विजयनगर येथें विठ्ठलाच्या मंदिराचे नैर्ऋत्येस थोड्या अंतरावर उभी आहे. दोन उंच खांबावर एक जाडजूड व गोपुराच्या शिखराच्या आकाराची तुळई टाकली आहे. तिच्या खालच्या बाजूस तराजू अडकविण्यासाठीं तीन दगडी कड्या आहेत. हा अवशेष पूर्वाभिमुख असून एका खांबाखालील तळखड्याच्या त्याच बाजूस एक पुरुष व दोन स्त्रिया यांच्या बेढब प्रतिमा खोदल्या आहेत. या बहुधा महाप्रतापी विजयनगर सम्राट् कृष्णराय व त्याच्या दोन राण्या यांच्या असाव्या (हंपी रुइन्स पृ. ४२-४५). दुसरें शिल्प कुंभकोणम् (तंजावर) येथील महामखम् तलावाच्या उत्तरेस असलेल्या लहानशा मंडपाच्या तुळईवर खोदलें आहे. यांत दोन खांबांवर एक तुळई टाकून तिच्या खालीं तराजू टांगला आहे. याच्या पारड्यांस प्रत्येकीं दोनच साखळ्या दाखविल्या आहेत. उजव्या पारड्यांत एक सवस्त्र सायुध व सालंकार पुरुष बसला असून डाव्या पारड्यांत बहुधा सुवर्ण नाण्यांची राशि आहे. तराजूच्या दांडीवर डाव्या अंगास अनुक्रमें गणेश, ब्रह्मा, विष्णु व शिव हे देव आणि उजव्या अंगास लोकपाल खोदले आहेत. मधल्या काट्याच्या ठिकाणीं वासुदेव दाखविला आहे. प्रत्येक पारड्याजवळ एक एक जोडपें

असून शिवाय डाव्या अंगच्या पारड्यापलीकडे चार ब्राह्मण होम करीत असल्याचेंही दृश्य आहे (आर्कीऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, ॲन्युअल रिपोर्ट इ. १९१२–१३, पृ. १४३, प्रतिमा ८४ ब). तिसरें शिल्प त्रिवेंन्द्रम् येथील पद्मनाभमंदिराच्या प्राकारांत आहे; पण त्याचें विस्तृत वर्णन मला अजून पहावयास मिळालें नाहीं आणि त्या मंदिरांतील कोणत्याही अवशेषाचें छायाचित्र घेण्याची मनाई असल्यानें फोटो मिळविण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला.

३ ऐतिहासिक निर्देश

प्राचीन तामिळ वाङ्मयांत शिलप्पादिकारम् नांवाचें एक महाकाव्य आहे. त्याच्या कालाचा अजून पक्का निश्चय झालेला नाहीं. त्याचें इंग्रजी भाषांतर श्री व्ही. आर. दीक्षितार यांनीं केलें असून त्यांच्या मताप्रमाणें त्याचा काळ इ. स. चें दुसरें शतक असावा. त्यांतील कथासूत्र मोठें मजेदार आहे. एकदां मदुरेच्या राणीचें एक पादभूषण राजसोनारानें चोरलें. त्याच वेळीं कोवलन् व कण्णकि नांवाचें एक जोडपें कण्णकीचें पादभूषण विकण्यासाठीं मदुरेच्या बाजारांत त्या सोनाराकडे आलें. सोनारानें राणीचें पादभूषण चोरणारा सांपडला म्हणून पुकारा केला. राजानें चौकशी न करतांच कोवलन्ला ठार केलें. कण्णकीनें स्वतःचें दुसरें पादभूषण मोडून राजाची खात्री करून दिली कीं, राणीचें पादभूषण निराळें व कोवलन्नें मोडावयास आणलेलें कण्णकीचें पादभूषण वेगळें. तेव्हां राजा पश्चात्तापानें मेला, तर राणी दुःखानें मेली. कण्णकीनें आपला डावा स्तन कापून मदुरेवर फेकला व 'जळो ती मदुरा ' असा शाप दिला. त्याप्रमाणें मदुरा जळली. नंतर ती मलैनाडुमधील ' मुरुगवेळ्कुण्रम् ' येथील पर्वतावर आली आणि नवऱ्याचे चौदावे दिवशीं रथांत बसून सदेह स्वर्गास गेली. ही कथा तेथील चेर राजा शेंगुट्टुवन् व त्याची राणी यांस कळतांच राणीनें कण्णकीचें म्हणजेच पट्टिनिक्कडवुळ् हिचें देऊळ बांधावयाचें ठरविलें. राजानें देवतामूर्तीसाठीं हिमालयांतून दगड आणावयाचा बेत करून तन्निमित्तानें उत्तरेंतील प्रदेशावर स्वारी केली, शिला मिळवून तीस गंगास्नान घातलें आणि सरकारी ज्योतिषी माडळन् यास स्वतःची सुवर्णतुला करून तिचें द्रव्य अर्पण केलें. असें कथासूत्र आहे. शेंगुट्टुवन्चा धाकटा पण यागी झालेला भाऊ इळंगो अडिगळ् यानें वरील काव्य रचिलें आहे.

पांड्य राजांपैकीं एकानें दिलेला एक ताम्रपट इ. १९०७ मध्यें मिळाला आहे त्यांत त्याचा बाप व जयन्तवर्मन् पांड्य याचा मुलगा अरिकेसरिन् मारवर्मन् यानें तुलाभारादि दानें केल्याचा निर्देश आहे. यांत कालोल्लेख नसला तरी इतर पुराव्या-वरून ताम्रपट देणारा राजा श. ५७२ (इ. ६५०) च्या सुमारास होऊन गेला असा अंदाज आहे (इमप्रे २।१०३६).

राष्ट्रकूट घराण्याचा संस्थापक दंतिदुर्ग याचा सामानगड येथें सांपडलेला एक ताम्रपट आहे. श. ६७५, माघ मास, रथसप्तमी (इ. ७५४ जानेवारी ५) या दिवशीं दंतिदुर्गानें कोप्पर ५०० प्रदेशांतील करंदिवडे जफितदेउलवाडा मिळून झालेला गांव, कऱ्हाड येथें राहणारा, वासिष्ठ गोत्री, त्रिविक्रमभट्टाचा नातू, कृष्ण-भट्टाचा मुलगा, नारायणभट्ट यास दान केला असें त्यांत सांगितलें आहे. हें नमूद कर-तांना तुलापुरुषस्थिते असा एक शब्दसमूह आला आहे. डॉ. फ्लीट यांनीं त्याचा अर्थ तुलाराशीशीं जोडला आहे. पण तें बरोबर दिसत नाहीं. येथें तुलापुरुषविधि चालू असतां किंवा तुलापुरुषस्थितेन मया म्हणजे तुलापुरुष केलेल्या मी असा अर्थ केला पाहिजे (इॲ ११।११२).

वेळ्वीकुडि येथें मिळालेल्या व पांड्य राजा नेडुंजडैयन् यानें आपल्या राज्या-भिषेकाच्या तिसऱ्या वर्षी (इ. ७६९–७०) केलेल्या दानपत्रांत त्याचा पणजा अरिकेसरिन् अथवा मारवर्मन् पांड्य यानें अनेक वेळां हिरण्यगर्भ व तुलापुरुष हीं महादानें करून त्यांची संपत्ति ब्राह्मणांस व अंधपंगूंस दिल्याचें आणि त्याचा बाप तेर्मारन् यानें अगणित गोसहस्र, हिरण्यगर्भ व तुलापुरुष हीं महादानें करून त्यांची संपत्ति ब्राह्मणांस वाटल्याचें नमूद केलें आहे (एइ १७।३०६, ३०७).

वऱ्हाडांत उमरावतीजवळ अंजनावती येथें सांपडलेल्या, राष्ट्रकूट सम्राट् ३ रा गोविंद याच्या दानपत्रांत श. ७२२ मध्यें सूर्यग्रहण झालें असतां (आषाढ वद्य ३० = इ. ८०० जून २५) गोविंदानें मयूरखंडी (मारकिंडा–नाशिक) या आपल्या निवासस्थानीं तुलापुरुषदानाचा विधि केला व तन्निमित्त उपर्युक्त अंजना-वती हा गांव तेरा ब्राह्मणांना दान केल्याचें सांगितलें आहे (एइ २३।१६, १७).

तंजावर जिल्ह्यापैकीं कुंभकोणम् तालुक्यांतील तिरुक्कोडिकावल् येथें तिरुक्को-डीश्वराच्या मुख्य मंदिराच्या दक्षिण भिंतीवर उत्तम चोलाची आई शेंबियन् मा-

देवियार् हिनें त्या मंदिराचा जिर्णोद्धार करीत असतां सांपडलेल्या अेका लेखाची प्रत खोदविली आहे. तींत कांचीच्या पल्लव वंशांतील उपांत्य राजा नृपतुंग (इ. ८४०–८६०) याची अेक राणी वीरमहादेवियार् हिनें उपर्युक्त ठिकाणीं हिरण्यगर्भ व तुलाभार हे विधि केले आणि त्यांपैकीं पन्नास कळंजु सोनें उपर्युक्त देवाच्या अंग-भोगासाठीं दिलें अशी माहिती आली आहे (साइइ १२।७४१).

उपर्युक्त राष्ट्रकूट तिसऱ्या गोविंदाचा मुलगा अमोघवर्ष याचा विजापूर जिल्ह्यापैकीं बागेवाडी तालुक्यांतील हूविन हिप्परगे गांवीं सांपडलेला एक लेख आहे. त्यांत अमोघ-वर्षानें श. ७८४, भाद्रपद वद्य ३०, शुक्रवार, सूर्यग्रहण (इ. ८६२ ऑगस्ट २८) या समयावर तुलापुरुषविधि करून गोळेयभट्ट नांवाच्या ब्राह्मणास पूविन पिप्परगे (हूविन हिप्परगे) हें गांव दान केलें अशी माहिती आली आहे (बॉकइ व्हा. १, भाग १, ले. ९).

चोळांचा मांडलीक राजा गंग, २ रा पृथ्वीपति, याच्या उदयेंदिरम् ताम्रपटांत चोळांविषयीं माहिती आली आहे. तींत पृथ्वीपतीच्या वेळचा सार्वभौमराजा, १ ला परान्तक चोळ किंवा वीर नारायण चोळ (इ. ९०७–९४७) यानें तुलाभार, हेमगर्भ, इत्यादि अनेक दानें व मंदिरें केल्याचें नमूद आहे (साइइ २।३८६).

बडोदें म्यूझियममध्यें बगुम्रा येथें सांपडलेलीं दोन दानपत्रें आहेत. हीं राष्ट्रकूट सम्राट् तिसरा इंद्रराज यानें केलेलीं असून दोघांचाही काल श. ८३६, युवा संवत्सर, फाल्गुन शुद्ध ७ (इ.९१५ फेब्रुवारी २४) असा आहे. या दिवशीं उपर्युक्त सम्राट् पट्टबंध महोत्सवासाठीं कुरुन्दक नांवाच्या गांवीं आला असतां त्यानें तुलेमध्यें बसून कुरुन्दकादि व इतर पूर्वीं दिलेलीं पण आतां लोपलेलीं चारशें गांवें, वीस लक्ष द्रम्मांसह दान केलीं. शिवाय लक्ष्मण गोत्री प्रभाकरभट्टास लाट देशापैकीं कम्माणिज्ज गांवाजवळचें उंबरा नांवाचें गांव आणि पाटलिपुत्राहून आलेल्या लक्ष्मणगोत्री सिद्ध-पभट्टाला उपर्युक्त कम्मणिज्ज गांवाजवळचें तेन्न नांवाचें गांव दान केलें अशा प्रकारची माहिती वरील दोन ताम्रपटांत आली आहे. येथें पट्टबंधमहोत्सव म्हणजे नव्यानें होणाऱ्या राज्याभिषेकाचा उत्सव नसून झालेल्या राज्याभिषेकाच्या वाढ-दिवसाचा उत्सव आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे (एइ ९।३२, ३३, ३६, ३७).

खंभायत येथें सांपडलेल्या ताम्रपटांत राष्ट्रकूट राजा चौथा गोविंद यानें शक ८५२, खर संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध १०, सोमवार, हस्तनक्षत्र (इ. ९३० मे १०) या

समयीं गोदावरी तीरावरील कपित्थक किंवा कवठें गांवीं पट्टबंध अर्थात् राज्याभिषेकमहोत्सव चालू असतां तुलेमध्यें बसून ब्राह्मणांना ब्रह्मकर्में चालावीं म्हणून ६०० अग्रहार, तीन लाख सुवर्णांसह (सोन्याच्या नाण्यांसह) दान केले. नंतर देवपूजा व मंदिरव्यवस्था इत्यादि बाबी चालाव्या म्हणून ८०० गांवें, चार लाख सुवर्ण आणि बत्तीस लाख द्रम्म दान केले आणि तुलेमध्यें बसूनच नागमार्य नांवाच्या ब्राह्मणास खेडा मंडलांतील केवंज नांवाचा गांव दान केला अशी माहिती दिली आहे. येथील महोत्सवही नव्यानें होणाऱ्या राज्याभिषेकाचा नसून राज्याभिषेकाच्या वाढदिवसाचा उत्सव आहे हें ध्यानांत ठेवावयाचें आहे (एइ ७।४०)

चोळ सम्राटांपैकीं आदित्य २ रा करिकाल याचा मुलगा अरुणमोळिवर्मन् उर्फ १ ला राजराज (इ. ९८५–१०१६) यानेंही तुलाभारविधि केल्याचें तिरुवालंगाडु ताम्रपटांत सांगितलें आहे (साइइ ३ । ३९७).

दक्षिणेमध्यें तुलाभारविधीसाठीं कांहीं ठिकाणीं स्वतंत्र मंदिरें उभारलीं होतीं असें दिसतें. उत्तरमेरु चतुर्वेदिमंगळम् (मदुरान्तक–चिंगलपट) येथील सुंदरवरद् पेरुमाल देवळासमोर असलेल्या हनुमान मंदिरांतील एका लेखांत चोळ राजा केसरिवर्मन् याच्या नवव्या राज्याभिषेकवर्षीं (इ. ९९३–९४) तुलाभारमंदिराच्या मुखमंडपांत भरलेल्या एका महासभेनें कांहीं निर्णय घेतल्याचें सांगितलें आहे. (एइ २२।२०७).

कुंभकोणम् (तंजावर) जवळ तिरुविशलूर नांवाचें एक गांव आहे. तेथील शिवयोगनाथस्वामिन् नांवाच्या शिवालयांत एक शिलालेख असून त्यांत महाप्रतापी राजा चोळ १ ला राजराज यानें आपल्या २९ व्या राज्यवर्षीं (इ. १०१४) प्रथम १२००० बेटें जिंकण्याची मोठी स्वारी काढली आणि तीमध्यें जय मिळवून तन्निमित्तानें त्याच वर्षीं तुलाभार हें महादान आणि त्याची एक राणी लोकमहादेवी हिनें हिरण्यगर्भ महादान केलें अशी माहिती आहे. हा लेख उपर्युक्त दंपतीच्या पुतळ्याखालींच कोरला आहे (एइ १२।१२१).

सिलिमपूर (बोग्रा, बंगाल) येथें एक शिलालेख सांपडलेला आहे. तो कामरूप (आसाम) मध्यें इसवीच्या ११ व्या शतकांत होऊन गेलेल्या कोणा जयपालदेव नांवाच्या राजानें खोदविला आहे. त्यांत उपर्युक्त राजानें तुलापुरुष नांवाचें महादान

करून तन्निमित्त वेंद्री येथील प्रहास नांवाच्या ब्राह्मणास मोठें बक्षिस दिलें; पण तें त्यानें नाकारलें अशी माहिती आली आहे (एइ १३।२८९,२९२).

गोव्याचा राजा कदंब २ रा गूहलदेव यानेंही तुलादान व त्याचा पूर्वज षष्ठराज यानें सोळा महादानें केल्याचा, श. ९६०, चैत्र शुद्ध १५, चंद्रग्रहण (इ. १०३८ मार्च २३) या दिवशीं दिलेल्या सावईवेरें ताम्रपटांत उल्लेख आहे (महाराष्ट्रांतील कांहीं प्राचीन ताम्रपट व शिलालेख पृ. ६६).

बडोदें संस्थानांतील नवसारी जिल्ह्यापैकीं गणदेवी येथें कदंब २ रा षष्ठदेव याचा शक ९६४ (इ. १०४२) चा एक लेख सापडला आहे. त्यांत हिंदुस्थानांतील अनेक राजांचा पराभव करून तो सुसज्ज सैनिक व आरमार यांसह प्रभासतीर्थी गेला असतां त्यानें सोमेश्वर किंवा सोमनाथ देवासमोर अनेक सुवर्णतुला केल्या व त्यामुळेंच बलि, कर्ण, युधिष्ठिर वगैरे दाते कसे होऊन गेले याची लोकांना कल्पना आली असें नमूद केलें आहे (इइचस्टे पृ. ६९,७०).

काश्मीरमध्यें अनंतदेव नांवाचा एक राजा होऊन गेला. त्यानें मंत्र्यांचा विरोध असत ही आपली राणी सूर्यमती हिच्या सांगण्यावरून तिचा दुर्वृत्त मुलगा कलश याजवर राज्यकारभार सोपविला. पण याबद्दल दोघांना पुढें असह्य मनस्ताप होऊन दोघांनींही राजधानी सोडून विजयेश्वर नांवाच्या देवस्थानाजवळ वस्ती केली. तेथें राहात असतां श. ९८५ (इ. १०६३) मध्यें दोघांनींही आपली सुवर्ण तुला करविली होती (राजतरंगिणी, तरंग ७, श्लोक ४०७).

सिलोनमधील पोलोन्नरुव येथील एका बौद्ध विहारांतील लेखांत सूर्यवंशांतील इक्ष्वाकु कुलांत उत्पन्न झालेला राजा विजयबाहु यानें (इ. १०६५) पर्यंत अनेक देश जिंकून अनुराधापुरांत प्रवेश केला, बुद्धधर्मरक्षणासाठीं संघाच्या विनंतीवरून राजमुकुट धारण केला, नंतर ब्रह्मदेशांतून श्रमणांना बोलावून घेऊन तीन निकायांचें शुद्धीकरण केलें आणि त्यांना प्रत्येकीं एका तुलाभाराचें दान केलें अशी माहिती दिली आहे (एइ १८।३३७).

चोळ सम्राट् पहिला कुलोत्तुंग (इ. १०७५-११००) किंवा त्याचा मुलगा व युवराज वीर चोळ याचें नरम सोन्याचें एक नाणें असून त्यावर ताजव्याचें चित्र काढलें आहे. हें शुद्ध न्यायाचें निदर्शक असण्याऐवजीं तुलाभाराविधीचें दर्शक

असावें अशी कल्पना आहे (म्हैआडिॲरि १९३४, पृ. ६६). तमिळ भाषेमध्यें तुलैपोन् नांवाचा एक शब्द असून त्याचा अर्थ तुलेचें सोन्याचें नाणें असा होतो हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे.

चंद्रावती दानपत्रांत कनोजचा राजा चंद्रदेव गाहडवाल या राजानें संवत् ११५६, वैशाख मास, अक्षत् तृतीया, शनिवार (इ. ११०० एप्रिल १४) या दिवशीं गंगा व वारणा या दोन नद्यांच्या संगमावर असलेल्या आदिकेशव नांवाच्या घाटावर स्नान करून आदिकेशवाच्या समोर तुलापुरुष व गोसहस्र हीं दोन महादानें उरकलीं आणि पांचशें ब्राह्मणांस मिळून एकंदर बत्तीस गांवें दान केलीं असें सांगितलें आहे. याच चंद्रदेवाचा नातू गोविंदचंद्र यानें सं. ११९९ मध्यें (इ. ११४२–४३) दिलेला एक ताम्रपट गगहा गांवीं सांपडला आहे. त्यांतही उपर्युक्त चंद्रदेवानें अनेक तुलापुरुष-विधि करून त्यांची संपत्ति ब्राह्मणांना वाटून टाकिली अशा प्रकारची माहिती आली आहे (एइ १४।१९७,१३।२१७,२१८).

बराकपूर (२४ परगणा जिल्हा-बंगाल) येथें मिळालेल्या दानपत्रांत पुढील माहिती आली आहे. सेन राजघराण्यांतील प्रसिद्ध राजा बल्लाळसेन याची आई व विजयसेनाची बायको विलासदेवी हिनें स्वतःची सुवर्णतुला केली. तन्निमित्तानें उदयकरदेव यानें केलेल्या होमाच्या सांगतेसाठीं त्यासच विजयसेनानें श. १०२२ (इ. ११००) च्या सुमारास पौंड्रवर्धन भुक्तीपैकीं खाडीविषयांतील घाससंभोग भाट्टवडा या गांवापैकीं कांहीं जमीन दान केली (एइ १५।२८०).

धारवाडजवळ नरेन्द्र नांवाचें एक गांव आहे. त्याखालीं कुंभापर नांवाची एक वाडी असून तींत गोव्याचा राजा २ रा जयकेशिन् कदंब व त्याची राणी मैळल-देवी यांनीं श. १०४७ (इ. ११२५) मध्यें दिलेल्या दानासंबंधीं एक लेख आहे. या लेखांत जयकेशीचा पूर्वज चट्टयदेव (षष्ठदेव) व त्याचा मुलगा १ ला जय-केशिन् यांनीं अनेक तुलापुरुषदानें करून त्यांची संपत्ति ब्राह्मणांना वाटून दिल्याचें सांगितलें आहे (एइ १३।३०२).

म्हैसूर संस्थानांतील हासन जिल्ह्यापैकीं हळेबीड गांवीं सांपडलेल्या शिलालेखांत माहिती आहे ती अशी—महामंडलेश्वर होयसळ विष्णुवर्धन हा राज्य करीत असतां त्याच्या हाताखालीं बेंटेय तिप्पेय नायक नांवाचा एक शंभर स्वारांचा पथक्या होता. त्यानें द्वारसमुद्र येथें एक शिवालय उभारलें आणि त्यासाठीं दान देण्याविषयीं

विष्णुवर्धन यास त्याचा मुक्काम वरदानदी संगमावरील हुल्लणितीर्थ येथें असतां विनंति केली. तेव्हां विष्णुवर्धनानें श. १०६३, रौद्री संवत्सर, आश्विन शुद्ध १५, गुरुवार (इ. ११४१ सप्टेंबर १७) या दिवशीं तुलापुरुषविधीमध्यें गुंतला असतांच कांहीं जमिनींचें इनाम करून दिलें. विष्णुवर्धनाच्या स्तुतीमध्यें त्यास ' हिरण्यगर्भ-तुलापुरुषाद्यनेकविधदानसंतर्पितमहीलोकम् ' असें विशेषण लावलें आहे (म्हैआ-डिॲरि १९३७, पृ. १७७,१७८)

बनारसजवळ गंगा व वारणा यांच्या संगमानजीक कमौली नांवाचें गांव आहे. तेथें सुमारें ५५ वर्षांपूर्वी २५ ताम्रपट सांपडले. त्यांपैकीं एकाचा काल संवत् १२३१, कार्तिक शुद्ध १५, गुरुवार (इ. ११७४ ऑक्टोबर १२) असा आहे. या ताम्रपटांत वरील दिवशीं कनोजचा राजा जयचंद्रदेव गाहडवाल यानें काशींस गंगास्नान करून शंकराच्या समोर तुलापुरुष महादान केलें व खांभमौअ हें गांव नऊ ब्राह्मणांना दान केल्याचें सांगितलें आहे (एइ. ४।१२६).

म्हैसूर संस्थानांतील शिमोगा जिल्ह्यापैकीं नगर तालुक्यांत असलेल्या हारोहित्तलु गांवीं एक वीरशिलालेख असून त्याचा काल श.१११३, विरोधकृत् संवत्सर, वैशाख शुद्ध ११, सोमवार असा आहे (इ. ११९१ एप्रिल ७). या लेखांत तेथील प्रदेशावर राज्य करणारा वीर शान्तर याचें ' पुष्कळ तुलापुरुष व महादानें करणारा . असें वर्णन केलें आहे (म्हैऑडिॲरि १९३१, पृ. २०७).

कर्नूळ जिल्ह्यापैकीं मर्कापूर तालुक्यांतील त्रिपुरान्तक येथील त्रिपुरांतकेश्वर देवळाच्या उत्तर भिंतीवर असलेल्या एका त्रैलिपिक व त्रैभाषिक लेखांत काडव (पल्लव) वंशांतील महाराज सिंह उर्फ २ रा कोप्पेरुंजिंग (सुमारें श. ११२२ = इ. १२००) यानें चिदंबरम् येथील पूर्व गोपुर उभारलें आणि चारही दिशांवर विजय मिळवून आणलेलें व तुलारोहणांतील द्रव्य खर्च करून त्या गोपुरास चारी बाजूंनीं सजविलें अशी माहिती आली आहे (साइइ खं. १२, ले. २४७).

श्रीरंगम् (त्रिचनापल्ली) येथील रंगनाथ मंदिराच्या दुसऱ्या प्राकारांत पूर्वे-कडील भिंतीवर मदुराधिप सुंदर पांड्य यानें श. ११७५–७९ (इ. १२५३–५७) चे दरम्यान खोदविलेला एक लेख आहे. त्यांत उपर्युक्त राजानें रंगनाथाच्या सांनिध्यांत अनेक वेळां तुलाधिरोह करून त्यांच्या द्रव्याचा श्रीरंगाचें देवालय बांधण्याकडे उपयोग केला असा निर्देश आहे (एइ ११।१४).

विजयनगरास हिंदू राज्य स्थापण्याचे कामीं पुढाकार घेतला म्हणून ख्यात असलेल्या विद्यारण्यांची माहिती देणारा विद्यारण्यकालज्ञान नांवाचा ग्रंथ आहे. त्यांत एक मनोरंजक माहिती आली आहे ती अशी–विद्यारण्य विन्ध्य पर्वतांत रहात असतां एकदां त्यांस तहान व भूक यांनीं व्याकूळ होऊन अस्थिपंजर झालेला एक ब्रह्मराक्षस भेटला. त्यास त्याचें नांव, तो तेथें अरण्यांत भटकत असण्याचें कारण व त्याची अशी दुर्दशा होण्याची सबब विचारिली असतां आपण पृश्निगोत्रांतील शृंगी नांवाचे ब्राह्मण असून त्रेतायुगांत रामांनीं केलेलें तुलापुरुषदान आपण स्वीकारलें पण आवश्यक तें तप मात्र केलें नाहीं यामुळें आपली अशी दशा झाल्याचें त्यानें सांगितलें (म्हैआडिअॅरि १९३२, पृ. १०४).

कोयिलोळुगु नांवाचा एक तमिळ भाषेंतील ग्रंथ आहे. त्यांत श्रीरंगम् येथील रंगनाथाला मिळालेल्या देणग्यांची नोंद आहे. तन्निमित्तानें मुसलमानांच्या प्रथम आक्रमणाच्या वेळीं श्रीरंगम् येथून हलविली गेलेली मूर्ति गोपण उडैयार् यानें श. १२९३ (इ.१३७१) मध्यें परत श्रीरंगम् येथें कशी स्थापिली याची मनोरंजक हकीकत दिली आहे. या हकीकतीबरोबरच त्यावेळचा विजयनगर सम्राट् हरिहर व त्याचा मुलगा विरूपाक्ष यांनीं रंगनाथ मंदिरांत तुलापुरुषविधि केल्याचें नमूद आहे (एइ ६।३२३).

म्हैसूर संस्थानांतील कडूर जिल्ह्यापैकीं कडूर होबळींत असलेल्या मच्चेरी गांवच्या नारायण जोशी नांवाच्या एका गृहस्थाकडे एक ताम्रपट सांपडला आहे. त्यांत पुढील माहिती आली आहे. श. १३३०, सर्वधारी संवत्सर, वैशाख वद्य ३०, गुरुवार, सूर्यग्रहण (इ. १४०८ एप्रिल २६) या समयीं विजयनगर सम्राट् देवराय यानें तुलापुरुषदान आणि श १३३१, विरोधी संवत्सर, कार्तिक शुद्ध १२, रविवार (इ. १४०९ आक्टोबर २०) या दिवशीं पंपापती (हंपी विरूपाक्षा) च्या सांनिध्यांत ब्रह्मांडदान केलें. या दोन्ही दानांप्रीत्यर्थ श. १३३१, मार्गशीर्ष शुद्ध ७ मीस आसंदि प्रांतांतील सावय भागापैकीं हिरिय बासूर व चिक्क बासूर या दोन गांवांतील अकराशें वराहांची जमीन एकत्र करून तीस अभिनवप्रतापदेवरायपुर असें नांव दिलें, तो गांव ब्राह्मणांना अग्रहार करून दिला आणि त्याची अमलबजावणी दानपरत्वें तुलापुरुष व ब्रह्मांड या दानांच्या कालापासून व्हावी असें फर्माविलें (म्हैआडिअॅरि १९२५, पृ. ४२,४३).

म्हैसूर तालुक्यापैकीं म्हैसूर भागांतलि कुरुबरहळ्ळि येथील शिलालेखांत माहिती आली आहे ती अशी–विजयनगर सम्राट कठारि साळुव नरसिंह यानें श. १४१९, पिंगल संवत्सर, श्रावण शुद्ध १५, शनिवार (इ. १४९७ ऑगस्ट १२) या समयावर शास्त्रसंशोधनानें प्राप्त झालेला असा तुलापुरुषविधि केला आणि कावेरी व कपिला या नद्यांमधील हंजेर अथवा मादणायकन हळ्ळि हा गांव अंबिकेचा उपासक व आपस्तंबसूत्री अशा कामियाचार्य नांवाच्या ब्राह्मणास अग्रहार करून दिला (म्हैऑडिॲरि १९२८, पृ. ५२,११६).

मद्रास इलाख्यांतील गुंटूर जिल्ह्यापैकीं प्राचीन बौद्ध स्तूपाविषयीं प्रसिद्ध अशा अमरावती गांवामध्यें असलेल्या अमरेश्वर मंदिरांत एक शिलालेख आहे. त्यांत विजयनगरकरांपैकीं अति बलाढ्य सम्राट् कृष्णराय यानें श. १४३७, युवा संवत्सर, आषाढ [शुद्ध] द्वादशी (इ. १५१५ जून २३) या दिवशीं कृष्णावेणी अर्थात् कृष्णा नदीच्या तीरावर शूलपाणीच्या म्हणजेच शंकराच्या सन्निध तुलापुरुष नांवाचें दान करून उत्कृष्ट अग्रहार वसविले अशी माहिती आहे (एइ ७।२१). याच कृष्णरायानें अनुक्रमें श. १४४४ (इ. १५२२), व श. १४५० (इ. १५२८) या दोन सालीं दिलेले दोन ताम्रपट उदयंबाकम् (तिरुक्कुळक्कुणरम्–चिंगलपट) व कांची या ठिकाणीं सापडले आहेत. या दोनही दानपत्रांत कृष्णराय व त्याचा थोरला भाऊ वीर नरसिंह यांनीं कांची, श्रीशैल, शोणाचल, कनकसभा (चिंदंबरम्), वेंकटाद्रि (तिरुमलै), हंपी, कालहस्ती, हरिहर, अहोबल, श्रीरंगम्, कुंभकोणम्, नंद्याळ, गोकर्ण, रामेश्वर इत्यादि देवस्थानीं व तीर्थस्थानीं अनेकदां कनकतुलापुरुषादि महादानें केल्याविषयीं सांगितलें आहे (एइ १४।१७१,१७२; १३।१२८).

विजयनगर सम्राट् अच्युतराय यानें निदान दोनदां तुलादान केल्याचे उल्लेख आहेत. पैकीं एक तुला मोत्याची असून ती कांची येथें विष्णुसन्निध श. १४५५, नंदन संवत्सर, श्रावण शुद्ध १२, रविवार (इ. १५३२ जुलै १४) या दिवशीं आपली एक पत्नी वरदांबिका व युवराज चिन वेंकटाद्रि यांसह केली होती आणि दुसरी तुला श. १४६१, विकारी संवत्सर, भाद्रपद शुद्ध १२, मंगळवार, श्रवण नक्षत्र (इ. १५३९ ऑगस्ट २६) या समयावर बहुधा विजयनगर येथें विठ्ठल स्वामींच्या देवळांत केली गेली. या प्रसंगांच्या स्मरणार्थ अच्युतरायाची दुसरी

पत्नी ओडुव तिरुमलैदेवी हिनें दोन संस्कृत श्लोक रचिले आहेत (एइ २४।२८६,२९०).

विजयनगरचा प्रसिद्ध वीर आणि तालिकोटच्या लढाईमुळें अधिक प्रसिद्धीस आलेला अळिय रामराजा याचा मधला भाऊ तिरुमलराय (इ. १५७०-७८) यानें कांची, श्रीरंगम्, शेषाचल, चिदंबरम्, अहोबलम्, इत्यादि तीर्थस्थानीं अनेकदां तुलापुरुषादि महादानें केल्याविषयीं निर्देश कित्येक ताम्रपटांत आले आहेत (एइ ११।३३२; १६।२९९). या तिरुमलरायाचा धाकटा मुलगा पहिला (इ. १५८६-१६१४) वेंकटपति यानें श. १५२० (इ. १५९८) मध्यें एक ताम्रपट मदुरेचा नायक कृष्ण भूपति याच्या विनंतीवरून दिला आहे. त्यांत हा कृष्ण व त्याचा बाप वीर भूपति या दोघांनींही तुलापुरुषदानें केल्याचा उल्लेख आहे (एइ १६।३१५, ३१६).

त्रावणकोर संस्थानांतलि त्रिवेंद्रम् या राजधानीच्या गांवीं पद्मनाभस्वामीचें प्रसिद्ध देवालय आहे. त्यांत तुलाभारविधीसाठीं दगडी तोरण उभारलें आहे. त्याच्या बाह्यांच्या तळखड्यांवर एक लेख असून त्यांत कलियुगसंवत् ४७०२, मिथुन महिन्याच्या द्वादशीस (इ. १६०१ जून ९) राजा वीर रविवर्मन् यानें तुलापुरुषविधि केला आणि तत्स्मरणार्थ त्याच्या दोन राण्यांनीं एक मंडप उभारला अशी माहिती आली आहे (इमप्रे ३।१७१८). याच संस्थानांतील 'वरकलै' येथें असलेल्या जनार्दनस्वामीच्या देवळाचे प्राकाराच्या पायावर खोदलेल्या एका लेखांत रविकुलशेखर नांवाच्या एका गृहस्थानें हिरण्यगर्भ व तुलापुरुष हीं महादानें केल्याचें नमूद आहे (इमप्रे ३।१७२०).

महाराष्ट्रांत मुसलमानी अमल सुमारें तीनशें वर्षें चालू होता. त्यावेळीं हिंदु आचारात्मक धर्मास ग्लानी आली होती. अशा कालांत महादानें करणारी व्यक्ति उंबराच्या फुलाप्रमाणें दुर्मिळच. तरीही स्वराज्याच्या उषःकालीं अशी एक व्यक्ती होऊन गेली. तिचें नांव मुरार जगदेव. हा विजापूरचा सुलतान मुहम्मद आदिलशाह याचा कांहीं काळ एक प्रधान होता. शहाजी, रणदुल्लाखान वगैरे दाक्षिणी अर्थात हिंदूपक्षपाती पक्षांतील तो एक प्रमुख होता. श. १५६० (इ. १६३८) च्या सुमारास कांहीं कारणांनीं यावर मुहम्मद आदिलशाहाचा रोष होऊन हा मारला गेला. यानें श. १५५५, श्रीमुख संवत्सर, भाद्रपद अमावास्या, सूर्यग्रहण (इ. १६३३

सप्टेंबर २३) अशा समयीं भीमा व इंद्रायणी यांच्या संगमावर असलेल्या नागरगांव नांवाच्या स्थानीं सोनें, रुपें इत्यादि चोवीस पदार्थांनीं चोवीस तुळांचें महादान केलें व तीनशें वराह किंमतीच्या भूमीचा अग्रहार निर्माण करून तो संगमेश्वर देव, १६ ब्राह्मण, स्वतःची संतति, एक कवि, एक वैय्याकरणी, एक पुरोहित, रायाराय नांवाचा आपल्या हाताखालचा अधिकारी आणि हळेगौड नांवाचा (स्वतःचें) घर बांधणारा यांमध्यें वाटून दिला. या अग्रहाराचें संगम असें नांव ठेवलें होतें. नागर गांवास तुळा झाली म्हणून त्यास सध्याचें तुळापूर हें नांव पडलें अशी समजूत आहे मुख्यतः ज्या ब्राह्मणांना अग्रहार करून दिला त्यांतील बहुतेक पुणें व त्याच्या आसपासचा भाग यांतील रहिवासी होते असें दिसतें (सनदापत्रांतील माहिती पृ. १९).

उदेपूर येथील जगन्नाथराय मंदिरांतील लेखांत उदेपूरचा राणा जगत्सिंह यानें केलेल्या ओंकारमांधात्याच्या यात्रेचें वर्णन आलें आहे. त्यांत तो ओंकारमांधात्या-जवळ नर्मदेच्या तीरावर पोचला असतां संवत् १७०४, आषाढ अमावास्या (दाक्षिणी ज्येष्ठ अमावास्या) सूर्यग्रहणसमयीं (इ. १६४७ जून २२) त्यानें स्वतःची सुवर्णतुला केली व तिचें द्रव्य ब्राह्मणांस वाटून टाकलें. या प्रसंगीं त्यानें जो तुलास्तंभ उभारला तो अजूनही तेथें विद्यमान आहे इत्यादि माहिती आली आहे. ओंकारेश्वराच्या देवळाबाहेर सं. १७०४, आषाढ शुद्ध पौर्णिमा, या मितीचा (इ. १६४७ जुलै ६) एक शिलालेख असून त्यांतही उपर्युक्त हकीकत आली आहे. जगन्नाथराय मंदिरांतील दुसऱ्या एका लेखांत असें सांगितलें आहे कीं, जगत्सिंहाचा मुलगा राजसिंह यानें अनौपचारिक रीत्या सं. १७०९, कार्तिक वद्य ४ (इ. १६५२ नोव्हेंबर ९) ला सिंहासनारोहण केल्यावर मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस एकलिंगजीस प्रयाण केलें आणि तेथें स्वतःची सोनें, रत्नें व रुपें यांनीं तुला करून तें धन ब्राह्मणांस वाटून टाकलें. येवढेंच नव्हे तर तो केवळ युवराज अस-तांही त्यानें गंगातटाकीं सोरों (शूकर) या तीर्थावर सं. १७०५, वैशाख शुद्ध १५ स (इ. १६४८ एप्रिल २७) स्वतःची सोनें व रत्नें यांनीं तुला केली होती (एइ २४।६२,६३,७४,८५,८७; राजपुतानेका इतिहास खंड २, पृ. ८४२).

शिवाजी महाराजांनीं आपली आई जिजाबाई हिची श. १५८६, पौष वद्य ३०, सूर्यग्रहण, (इ. १६६५ जानेवारी ६) या समयीं महाबळेश्वर येथें तुळा केली

आणि तेव्हांच त्यांचा अत्यंत विश्वासू मंत्री सोनाजीपंत यानेंही आपली तुळ केली अशी माहिती मिळते (शिवचरित्रप्रदीप पृ. २३,५१,६०).

म्हैसूर शहरांतील शेषभट्ट नांवाच्या ब्राह्मणाकडे मिळालेलें व श. १५८९, प्लवंग संवत्सर, चैत्र शुद्ध ३, रविवार (इ. १६६७ मार्च १७) या मितीचें एक दानपत्र आहे. त्यांत चामराज, कंठीरव व देवराज या तिन्ही म्हैसूर राजांचा आश्रित व व्यापारी गुजराथी ब्राह्मण धन्नोजी यानें सर्व हिंदुस्थानभर केलेल्या अनेक दानधर्मांची माहिती आली आहे. तींत त्यानें तुलादान केल्याचेंही नमूद आहे (म्हैआडिॲरि १९३४, पृ. १५७).

शिवाजी महाराजांनीं स्वतःची सुवर्णतुला कशी केली याचें चक्षुर्वै सत्यं असें वर्णन उपलब्ध आहे. तें महाराजांच्या राज्याभिषेकसमयीं रायगडास उपस्थित असलेला इंग्रज वकील हेन्री ऑक्सिंडेन याच्या रोजनिशींत पहावयास मिळतें. त्याचें सार असें—शिवाजी महाराजांनीं श. १५९६, ज्येष्ठ शुद्ध १३ (इ. १६७४ जून ६) रोजीं स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. तत्पूर्वीं त्यांनीं अनेक धार्मिक कृत्यें केलीं त्यांत ज्येष्ठ शु. ४ थीस (मे २९) त्यांनीं स्वतःची सुवर्णतुला केली. तिला १६००० होन लागले. या रकमेंत महाराजांनीं आणखी १ लाख होनांची भर घातली आणि ती सर्व रक्कम राज्याभिषेकानिमित्त जमा झालेल्या ब्राह्मणांना वाटावयाची असें ठरविलें होतें (शिवकालीन पत्रसारसंग्रह खं. २, ले. १६४३).

बाळाजी विश्वनाथाची बायको व बाजीचिमाजींची आई राधाबाई हिच्या काशीयात्रेच्या निमित्तानें घडलेल्या एका मनोरंजक तुळेची माहिती पेशव्यांचे राजगुरु दीक्षित पाटणकर यांचे वंशज डॉ. मो. गं. दीक्षित यांजकडील एका अप्रसिद्ध पत्रावरून कळून येते. एक्कावन गंगापुत्र सुमारें ७०० यात्रेकरूंसह नर्मदेपासून तिजबरोबर होते. त्यांनीं काशीस प्रत्येक यात्रेकरूमागें निदान दहा रुपये दक्षणा मिळाली पाहिजे म्हणून धरणें घेतलें. तेव्हां काशीस पाटणकरांपैकीं बाळकृष्ण दीक्षित होते. राधाबाईच्या सांगण्यावरून त्यांनीं केलेल्या मध्यस्थीमुळें गंगापुत्रांनीं धरणें उठविलें. पण दक्षिणेचा निकाल न होतांच यात्रा परतली. तेव्हां गंगापुत्र बाळकृष्ण दीक्षितांच्या गळां पडले. बाळकृष्ण दीक्षितांनीं नाइलाजानें स्वतःच्या भारंभार रुपये देतों म्हणून सांगितलें. या वचनांतून मुक्त होण्यासाठीं दीक्षितांनीं प्रथम स्वतःची खुर्चीची

(तांब्याच्या नाण्यांची) तुला करून तो ब्राह्मणांस वाटून टाकला आणि नंतर खुर्याच्या वजनाइतके रुपये गंगापुत्रांस दिले. ते ६३५५ भरले.

छत्रपति शाहूची धाकटी बायको सगुणाबाई ही इ. १७४८ ऑगस्ट २५ रोजीं बरेच दिवसांच्या आजारानंतर मृत्यू पावली. मृत्युपूर्वी थोडे दिवस तिची सुवर्णतुला करण्यांत येऊन तुलाद्रव्यापैकीं ६५० मोहरा, बनारस (५००), प्रयाग (१००) व गया (५०) येथें दान करण्यासाठीं गोविंद बल्लाळ खेर ऊर्फ गोविंद पंत बुंदेले याचे मार्फत नारायण दीक्षित पाटणकर यांजकडे पाठविल्याचें नमूद आहे (बाब्रापेरो १।८६).

बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी भाग १ पृ. ११८ वर एक उतारा आहे. त्याची तारीख श. १६८२, मार्गशीर्ष शु. १५ (इ. १७६० डिसेंबर २२) ही असून त्यांत वाई (सातारा) येथील व्यास उपनामक ब्राह्मणास वाई जवळच्या बावधन गांवची ३० बिघे जमीन इनाम दिल्याचें सांगितलें आहे. पण अंतरित संकल्पाची ही निष्कृति होती. बाळाजी बाजीरावाची आई काशीताई हिची तुला केली गेली तेव्हां भूमिदानाचा संकल्प सोडला होता; पण संकल्पाप्रमाणें प्रत्यक्ष भूमिदान झालें नव्हतें. दरम्यान इ. १७५८ नोव्हेंबर २७ ला काशीताई मरण पावली. तेव्हां ती जिवंत असतांना सोडलेला संकल्प तिच्या मरणानंतर सुमारें दोन वर्षांनीं पुरा केला गेला.

बाळाजी बाजीरावानें स्वतःच्या अनेक तुला केल्याचें आढळून येतें. पैकीं एक सुवर्णतुला श. १६६६, भाद्रपद वद्य ४, अंगारकी चतुर्थीस (इ. १७४८ ऑगस्ट ३०) थेऊर येथें झाली. त्यावेळीं नानासाहेब तुळेसाठीं चिलखत, ढाल, तलवार, तरकस व कमान घेऊन बसला होता आणि त्याचें वजन तेव्हां सात हजार मोहरा भरलें असें एका पत्रांत नमूद केलें आहे (पुरंदरे दफ्तर ३।१८७). दुसरी तुला श. १६७६, आषाढ शुद्ध ६ (इ. १७५४ जून २६) रोजीं झाली. पण तिचा खर्च रोजनिशींत आषाढ वद्य २ (जुलै ६) ला मांडला आहे. तुलेसाठीं एकंदर १०६४१२०११ रु. लागले. त्यांत ८६४१०८१२ किंमतीच्या ५८२४ मोहरा होत्या आणि २०००१८१५ किंमतीच्या ११७६०७ तोळे वजनाच्या पुतळ्या होत्या. मोहरा व पुतळ्या यांचें वजन एकत्र केल्यास तुलेचें वजन ८७। शेर होतें. सवस्त्र व सायुध अशी तुला केली गेली असें गृहीत धरलें तरी बाळाजी बाजीरावाचें वजन एव्हां १६० पौंड होतें असें समजण्यास हरकत नाहीं.

सुवर्णतुलेनंतर लोखंड, कासें, शिसें, नारळ, चंदन व भात अशा सहा पदार्थांनीं सहा तुला केल्या अशींही अधिक माहिती मिळते (बाबापेरो ११११४; मइसा ६।१०८). तिसरी सुवर्णतुला श. १६८१ च्या चौथ्या तिमाहींत (इ. १६६०, पहिली तिमाही) किंवा अधिक निश्चित बोलावयाचें तर या सालच्या फाल्गुन पौर्णिमेच्या सुमारास पैठणास झाली. श. १६८२, चैत्र शुद्ध १३ (इ. १६६० मार्च २९) च्या एका पत्रांत बाळाजी बाजीरावानें या तुलेच्या द्रव्यापैकीं ५००१८१३। रुपये किंमतीच्या ३२७ मोहरा पुण्यास बाबूराव राम फडणीस याजकडे पाठवून त्यांचा विनियोग गरीब व अतिशय गरजू अशा ब्राह्मण कुटुंबांतील लोकांच्या लग्नमुंजींसाठीं करावा असें आज्ञापिलें आहे (पेशवे दफ्तर १८।१३०). चौथी तुला श. १६८३ चैत्र शुद्ध ७ (इ. १७६१ एप्रिल ११) रोजीं नर्मदातीरीं ओंकारमांधात्याजवळ केली. तिची नोंद चैत्र शुद्ध १४ (एप्रिल १८) रोजीं केली आहे. तुलाद्रव्याची एकंदर किंमत ७३१२४८१५ रुपये झाली होती. त्यांत निव्वळ सोनें २५६८ तोळे, १॥ गुंज, इक्केरी होन १६००० आणि मोहरा १००० होत्या. हिशेब केल्यास या सर्वांचें वजन सुमारें १३३ पौंड होतें. ही तुलाही सवस्त्र व सायुध झाली असें मानलें तर बाळाजी बाजीरावाचें वजन एव्हां १२० पौंडांच्या आसपास असलें पाहिजे. उंची बरीच असेल तरच हें वजन मनुष्य रोडावल्याचें निदर्शक होऊं शकेल. बाळाजी बाजीराव या वेळीं अगदीं वाळला होता असे लेख आहेत. तेव्हां या वजनावरून कृशतेची कल्पना येऊं शकेल. तुलाविधीचा इतर खर्च २०४८३ रु. आला होता. त्यांत गणपति, गोविंद, उमापति व विनायक यांच्या पूजेस प्रत्येकी १ मोहोर आणि विधि करविणारा आचार्य बाळकृष्णभट खरे यास दक्षणा ७ मोहरा दिल्या असें खर्चाच्या तपशीलावरून दिसून येतें (बाबापेरो १।११९,१२०).

रामचंद्र बाबा शेणवी हे पेशवाईतील प्रख्यात मुत्सद्दी आणि राणोजी व जयाप्पा शिंदे यांचे दिवाण होते. शिंदेहोळकरांच्या तक्रारीमुळें पेशव्यांनीं त्यांना दिवाणपदावरून दूर करून आपले जवळ ठेविलें होतें. तदनंतर २ वर्षांनीं बरेच दिवसांचें दुखणें येऊन श. १६७६, आश्विन वद्य पंचमी (इ. १७५४ आक्टोबर ६) स ते वारले. त्यापूर्वीं त्यांनीं 'दोन तुला सोन्याच्या व दोन तुला रुप्याच्या केल्या' होत्या (पेद ४०।८४).

हिंगणे घराण्यांतील दामोदर महादेवानें स्वतःची काशीमध्यें इ. १७५५ च्या अखेरीस रौप्य तुला केली होती (मइसा ३।४७१).

इ. १७५७–५८ मध्यें रघुनाथराव उत्तर हिंदुस्थानच्या दुसऱ्या स्वारीस गेला असतां एकदां त्याचा मुक्काम कुरुक्षेत्र येथें पडला. तेथें त्यानें कांहीं तुलादानें केल्याचें भाऊसाहेबांच्या बखरींत नमूद आहे (साने संपादित, पाचवी आवृत्ति, पृ. ३९).

नानासाहेब पेशवे यांची दुसरी स्त्री राधाबाई पेशवे ही श. १६९३, कार्तिक शुद्ध ३ (इ. १७७१ नोव्हेंबर ९) रोजीं वारली. तत्पूर्वीं ती फार आजारी पडून वांचत नाहीं असें वाटल्यामुळें नाना फडणीसानें थोरल्या श्रीमंतास (रघुनाथरावास) लिहून आज्ञा आणविली आणि तिची रौप्यतुला व तदनुषंगानें इतरही किरकोळ तुला केल्या. पैकीं रौप्यतुलेस चार हजार आणि अवांतर एक हजार रुपये लागले अशी एका पत्रांत माहिती आहे (ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३, पृ. १५६). ह्या तुला श. १६९३ च्या ज्येष्ठ महिन्यांत बहुधा झाल्या असाव्या.

थोरल्या माधवराव पेशव्यानें एकंदर किती तुला केल्या हें पक्कें ठाऊक नाहीं. पण त्याच्या तीन सुवर्णतुलांविषयीं माहिती मिळते. पैकीं एक हैदरावरील स्वारीहून परत येतांना श. १६९२, वैशाख वद्य ३०, सूर्यग्रहण (इ. १७७० मे २५) या समयीं कृष्णा व घटप्रभा यांच्या संगमावर–हा कप्पडि गांवाजवळ झाला असल्यानें यास मराठींत कपाट संगम म्हणतात–झाली एव्हां माधवराव अंगावर पांढरा पोशाख, जोडी, कंठी व इतर, पोथी, देवपंचायतनाचें संपुष्ट येवढें साहित्य घेऊन तुलेंत बसला होता. या वेळीं ५९७६ तोळे वजनाच्या व ९८५०४॥ रु. किमतीच्या मोहरा व पुतळ्या लागल्या. अर्थात् यावेळीं तुळेचें वजन ७४॥ शेर झालें. पैकीं पोशाख वगैरेचे ४॥ शेर वजा केले तर एव्हां माधवरावाचें वजन ७० शेर = १४० पौंड भरलें असें समजण्यास हरकत नाहीं. दुसरी सुवर्ण-तुला श. १६९३, आषाढ शुद्ध १, दक्षिणायन, कर्कसंक्रमण (इ. १७७१ जुलै १३) या समयीं गोदातीरीं कटोरें गांवीं झाली. तीसाठीं मोहरा, पुतळ्या व लगडी मिळून ६२०७ तोळे ७॥ मासे इतकें सोनें लागलें. यांचें वजन ७७॥ शेर किंवा १५५ पौंड होतें. पण तुळेस बसतांना माधवरावाजवळ तरकस (बाणांचा भाता), कमान (धनुष्य), चित्रयुक्त मोठी ढाल, थोरली मगरबा (पश्चिमी–युरोपीय ?) तलवार, शिक्केकट्यार, कलमदान, खाशी कट्यार, (विष्णु !)सह-स्रनामाची रोज वाचण्याची पोथी आणि शालिग्रामासुद्धा स्वारीचे देव इतक्या वस्तु असल्यानें या वेळीं माधवरावाच्या शरीराचें वजन बरेंच कमी म्हणजे सुमारें १२० पौंड

असण्यास हरकत नाहीं. याशिवाय पांढरा पोषाख, कंठी, जोडी, अष्टकोनी हिऱ्याची आंगठी आणि किमरवाची तुवा (ञुवा ?) या वस्तू होत्या. पण त्यांचें वजन फार नसावें. तिसरी तुला कोपरगावाजवळ पश्चिमवाहिनी गोदेच्या कांठीं कचेश्वर येथें श. १६९३, आश्विन शुद्ध १५, चंद्रग्रहण (इ. १७७१ आक्टोबर २३) या समयावर झाली. तीसाठीं ७००० हजार मोहरा लागल्या. या वेळीं माधवरावानें आपल्या बरोबर शालिग्रामांचें ताम्हण, मखमलीनें मढविलेलें लाकडी कलमदान, शिक्केकट्यार, मगरबा, थोरली कट्यार, वाचावयाची पोथी, पांढरे मुठीचा खंजीर, पांढरा पोशाख, कंठी, जोडी, माणकाची आंगठी आणि गझनीचा झुबा येवढें साहित्य घेतलें होतें. मोहरांचें वजन वरच्या दोन दाखल्यांच्या साह्यानें काढलें तें सुमारें ७९½ शेर भरलें. साहित्याचें वजन सुमारें १५½ शेर उणें केलें तर माधवरावाचें वजन सुमारें ६५ शेर किंवा १३० पौंड व्हावें (ऐलेसं. ४। ९७८, ९८३ ९८७; इचलकरंजी संस्थानचा इतिहास ले. १०१, १०३; कै. पां. न. पटवर्धन संशोधित लिंब चर्चे—अप्रकाशित कागद, भा. इ. सं. मंडळ संग्रह ७७२-७७४/३).

श. १७०८, पौष वद्य अमावास्येस (इ. १७८६ डिसेंबर २०) प्रसिद्ध उदार राज्यकर्त्री अहिल्याबाई होळकर हिनें आपल्या नातवासह स्वतःच्या पसतीस तुला केल्या. पैकीं मुख्य सोनें व रुपें यांच्या होत्या. तिळ, गुळ वगैरे पदार्थांच्या तुलाही अर्थात झाल्या असतील हें सांगणें नलगे (पारसनीस—महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग २, ले. १४० व प्रभाकरकविकृत पद).

राजमहेन्द्री येथील गोपालस्वामी मंदिराच्या पूर्वद्वारांत एक लेख असून त्यांत श. १७४२ (इ. १८२०) मध्यें कोणा वेंकटराय नांवाच्या मनुष्यानें राजमहेन्द्रीस तुलारोहणविधि केला आणि बहुधा त्याच्या द्रव्यांतून वेणुगोपाल, नृसिंह व वेंकटेश्वर अशा तीन देवतांचीं मंदिरें उभारलीं असें नमूद केलें आहे (इंमत्रे २।७२२)

म्हैसूर जिल्ह्यापैकीं कृष्णराजपेठ तालुक्यांतील कृष्णहळ्ळी गांवीं राहणाऱ्या केशवमूर्ति नांवाच्या गृहस्थाकडे मिळालेल्या सनदेवरून असें दिसतें कीं, कृष्णराज ओडेयराचा नातू, इम्मडि कृष्णराजाचा मुलगा, चामराज ओडेयर याची राणी देवाजम्माणि हिनें श. १७४८, व्यय संवत्सर, आषाढ शु. १०, शुक्रवार, दक्षिणायन संक्रांति (इ. १८२६ जुलै १४) या पर्वकालीं तुलाभारदान करीत असतां नरसीपूर तालुक्यांतील हेमावती नदीतीरीं असलेल्या हेमगिरिजवळच्या बंडिहळ्ळि गांवीं

देवांचा नांवाचा अग्रहार करून तो ब्राह्मणांना दिला. शिवाय तेरा गांवें साठ ब्राह्मण व ग्रामदेवता यांत वाटून दिलीं (म्हैआडिॲरि १९२७, पृ. ९८,९९).

इ. १८७९ मध्यें श्री. विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं चंद्रग्रहणांत सपत्नीक रौप्य-तुला केली होती. इ. १८९२ एप्रिल २९ रोजीं त्रावणकोरच्या राजानें तुला केली असून तिची हकीकत मद्रासमेल वर्तमानपत्राच्या त्याच सालच्या मे ३ च्या अंकांत आली होती. इ. १९०० मध्यें उदेपूरचे सध्याचे महाराज भूपालसिंह हे आजारी झाल्यामुळें त्यांतून बरे होण्यासाठीं त्यांची सुवर्णतुला केल्याची माहिती मिळते. श्री. पद्मावतीबाईसाहेब घोरपडे व श्री. अनुबाईसाहेब घोरपडे यांनी अनुक्रमें १४।३।१९०३ व १४।१।१९०४ रोजीं इचलकरंजी येथें स्वतःच्या रौप्यतुला केल्या. श्री. गिरिजाबाईसाहेब पटवर्धन यांनीं मिरजमळा येथें ता. २९।४।१९०४ रोजीं सुवर्णतुला केली. श्री. बळवंत त्र्यंबक दातार यांनीं इ. १९०५ मध्यें इचल-करंजीस स्वतःची रौप्यतुला केली. ता. २६।७।१९३१ रोजीं मुंबईचे व्यापारी केशव विष्णु गोखले यांनीं पुण्यास स्वतःची रौप्यतुला करून तिचें द्रव्य (रु. २५२०) पुण्याच्याच अनाथविद्यार्थिगृहास दैनंदिन खर्चासाठीं दान केलें. महाराजा भगवतसिंहजी यांनीं गोंडल येथें ता. २५।८।१९३४ रोजीं स्वतःची सुवर्णतुला केली. ता. २७।९।१९४६ रोजीं पेटलाद येथील दानशूर व ८२ वर्षांचे वृद्ध गृहस्थ श्री. छोटालाल मोहनलाल भगत यांनीं स्वतःची सुवर्णतुला करून तिचें द्रव्य व्यक्ति व संस्था यांस वाटून टाकलें. यांनीं पूर्वीं एकदां सपत्नीक रौप्यतुलाही केली होती. कोल्हापूरचे श्री. कृ. ह. सहस्रबुद्धे यांनीं ता. १३।१२।१९४६ रोजीं स्वतःची रौप्यतुला केली. याच महिन्यांत विद्याभूषण तांबेशास्त्री यांनीं स्वलिखित ग्रंथांनीं स्वतःची तुला केली.

सांगली येथील श्रीगजानन मिल्सचे धनी श्री. विष्णु रामचंद्र वेलणकर यांनीं आपली सुवर्णतुला ता. १९ जानेवारी १९४७ रोजीं केली. तुलेचें वजन ५०७९ तोळे भरलें आणि त्या सोन्याची किंमत ५३७१०४८४ इतकी झाली. हे सर्व पैसे अर्थात् श्री. वेलणकर यांनीं दानधर्मांत खर्च केले हें सांगणें नकोच. ह्या द्रव्यांतून त्यांनीं दिलेल्या ठळक देणग्यांचा तपशील असा—सांगली हॉस्पिटल एक लक्ष रुपये; यांत उपर्युक्त मिलमधील पंधरा बाह्य आणि पांच प्रवेशित रुग्ण कामगारांना मोफत औषधोपचार होणार आहे. सांगली येथील अभ्यागतगृह(धर्मशाळा)—एक लक्ष रुपये. परदेशीं जाऊन कला हस्तगत करून येणारांस उपयोगी पडणारा कर्ज-

देवनिधि–एक लक्ष रुपये. २५००० सांगली–विलिंग्डन कॉलेजचें सभागृह. १०००० सांगली–अनाथ विद्यार्थिगृह. १०००० सांगली–एंजिनियरिंग कॉलेज. ५००१ सांगली–गजानन मिल्स कामगार–रात्रीची शाळा. ५००० सांगली–गर्ल्स हायस्कूल. ५००० हिंदुत्वप्रचारकार्य. ५००० पुणें–कपिलाश्रम रसायननिधि.

मुंबईतील गिरगांवांत असलेल्या सुप्रसिद्ध ज्ञानसागर लिथो प्रेसचे धनी श्री. केशव गणेश ऊर्फ बाबूराव जोशी (मूळ गांव गोंधळें–चिपळूण–रत्नागिरि) यांना ता. २३।११।१९४७ रोजीं एकसष्टावें वर्ष लागलें. तन्निमित्तानें त्यांची रौप्यतुला करावी असें त्यांच्या आप्तांच्या मनांत आलें. श्री. बाबूराव यांस ती कल्पना पटून त्याप्रमाणें वरील दिवशीं मुंबईच्या ब्राह्मण सभेंत सकाळीं साडे नऊ वाजतां मुख्य तुलाविधि झाला. यासाठीं मुंबईशिवाय नाशिक, नागपूर, पुणें, सातारा, रत्नागिरी, मोर्वी या ठिकाणांहून आप्तस्वकीय आले होतेच; पण सुमारें दोन हजार इतर समुदायही जमला होता. तुलेसाठीं लागलेल्या रुप्याचें वजन १२७ पौंड, १४ आणे इतकें भरलें आणि त्याची किंमत ८००१०११ झाली. तुलाविधीस खर्च रोख सुमारें पांचशें रुपये आणि साहित्य असा आला. तुलेचा पैसा दान करावयाचा असतो. त्याप्रमाणें यांतून त्यांनीं विविध व्यक्ति व संस्था यांस देणग्या दिल्या.

या खेरीज त्या दिवशीं श्री. बाबूराव यांनीं स्वतःचे एक्कावन हजार रुपये दिले व इतर लिथोग्राफर्सनीं पन्नास हजार रुपये जमविले आणि या सर्व पैशाचा विनियोग लिथोग्राफिक आर्ट्स स्कूल किंवा औद्योगिक शिक्षण यांत करावा म्हणून एक ट्रस्ट केला आहे.

भारतीय संस्कृतीचा जेथें जेथें प्रसार झाला तेथें तेथें तुलादानविधीचेंही अनुकरण करण्यांत आलेलें दिसतें. उदाहरणार्थ सयाममध्यें श्रावण महिन्यांत तेथील राजा न चुकतां व राण्या प्रसंगवशात् स्वतःची तुला करीत. तेथें ही चाल इ. सनाच्या १८ व्या शतकाचे मध्यानंतर मागें पडली असें दिसतें (एन्सायक्लोपिडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स खंड ५, पृ. ८८७).

अकबराच्या पदरीं अबुल–फज्ल नांवाचा एक मोठा विद्वान मनुष्य होता. त्यानें अकबराच्या राज्यपद्धतींतील कायदेकानू, रिवाज, चालीरीति, इत्यादि अनेक विषयांचें संकलन करणारा आईन–इ–अकबरी या नांवाचा एक अत्यंत महत्वाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत अकबराच्या तुलेविषयीं पुढील माहिती दिली आहे. एक

शुभकृत्य व गरिबांस दान करण्याची संधी या दोन कारणांनीं अकबर स्वतःची प्रतिवर्षी दोन वेळा तुला करी. आबान महिन्याच्या पहिल्या तारखेस (आक्टोबर १५) त्याचा सौरगणनेप्रमाणें वाढदिवस येई. त्यादिवशीं त्याची, सोनें, पारा, रेशीम, सुगंधी द्रव्यें, तांबें, रूह–ई–तूतिया (कथील व शिसें यांचें मिश्रण), औषधें, तूप, लोखंड, खीर सप्तधान्यें आणि मीठ अशा बारा पदार्थांपैकीं एकेका वेळीं एकेक पदार्थ घेऊन बारा तुला करीत. कोणत्या तुलेसाठीं हे पदार्थ कोणत्या क्रमानें घ्यावयाचे हें त्यांच्या तत्कालीन मूल्यावरून ठरवीत. तुलेनंतर बादशाहाच्या वयास जितकीं वर्षें झालीं असतील तितकीं मेंढरें, बोकड व कोंबडे त्यांची जोपासना करणाऱ्यांस बक्षीस दिलीं जात. नंतर शिकारखान्यातले पुष्कळसे क्षुद्र प्राणी मोकळे सोडीत. दुसरा अर्थात् चांद्रमानाचा वाढदिवस ता. ५ रजब रोजीं येत असल्यानें त्या दिवशीं दुसरी तुला होई. या वेळीं रुपें, कथील, कापड, शिसें, फळें, मोहरीचें तेल, भाज्या अशा ८ (७?) पदार्थांपैकीं एकेका वेळीं एकेक पदार्थ घेऊन आठ वेळां तुला होई. दोन्ही दिवशीं वाढदिवसाचा उत्सव असल्यानें सर्व दर्जाच्या लोकांत देणग्या व क्षमा यांची खैरात होई. बादशाहाचे मुलगे, नातू व लेकवळे यांची प्रत्येक सौर वर्षांत फक्त एकदांच तुला होई. कोणतेंही मूल दोन वर्षांचें झालें म्हणजे त्याची पहिली तुला करीत. त्या वेळीं तुळेसाठीं एकच पदार्थ घेत. पण पुढें प्रत्येक वर्षी तुळेसाठीं एकेक अधिक पदार्थ घेत. सामान्यतः पदार्थांची संख्या सात किंवा आठपर्यंत वाढवीत. मात्र कांहीं झालें तरी तुळेचे पदार्थ बारापेक्षां अधिक केव्हांच होत नसत. प्रत्येक तुलाप्रसंगीं कांहीं प्राणी मोकळे सोडीत. अशा तऱ्हेनें अकबराच्या कारकिर्दींत तुलाविधीस महत्त्व व वैपुल्य आल्यानें ते विधी नीट पार तर पडावे आणि गैरवाजवी खर्च तर होऊं नये म्हणून एकेक स्वतंत्र खजान्ची व हिशेबनीस यांची नेमणूक अकबरानें केली होती. वास्तविक तुलाविधि हिंदू संस्कृतीचा निद-र्शक आहे. परंतु अकबरानें त्याचा अंगिकार केल्यामुळें तो मुसलमानी संस्कृतींत अंतर्भूत झाला. प्रथम हा वर्षांतून एकदांच म्हणजे चांद्रमानाच्या वाढदिवशीं होई. पण अकबरानें इलाही सन सुरू केल्यानंतर त्याचें शम्सी वजन (सौर तुला) व कम्री वजन (चांद्र तुला) असे दोन्ही निर्देश आढळतात. हे दोन्ही दिवस उत्स-वाचे असल्यानें या दिवशीं दरबारी लोक नजराणा देत आणि त्यांच्या मनसबींत बादशाही इच्छेप्रमाणें कमीअधिक बढती होई. या दिवशींच्या मेजवानीस अंतःपुरांत फार महत्त्व असें आणि तुळावयाचे पदार्थ तेथूनच येत. अकबर आपल्या तुळेचें


पदार्थ ब्राह्मणांस वाटून टाकी. हि. ९७३ रजब ५ रोजीं झालेल्या तुळेंतील पदार्थ अशा तऱ्हेनें ब्राह्मणांस वाटून टाकल्याचें उदाहरण बदाऊनी नांवाच्या प्रसिद्ध इतिहासकारानें आपल्या मुन्तखबुत्तवारीख या इतिहासग्रंथांत नमूद केलें आहे (खंड २, पृ. ८४). अशा प्रसंगां कवी चांगलीं कवनें करण्याचा प्रयत्न करीत.

जहांगीरच्या कारकिर्दींत तुलाविधीचे हेच प्रघात चालू होते. त्यानें त्यांत कांहीं विशेष बदल केल्याचें आढळत नाहीं. जहांगीरच्या एका वेळच्या तुळेची किंमत ३३००० रुपये झाली आणि हें द्रव्य अंतःपुरांतील स्त्रियांस वाटण्यांत आलें. त्याच्या ४७ व्या वर्षीं केलेल्या एका तुळेचे वेळीं त्याचें वजन ६५१४ तोळे भरलें. जहांगीरची एक तुला त्याच्या आईच्या वाड्यांत झाली होती. प्रसंगवशात् चांगली सेवा बजाविल्याबद्दल दरबाऱ्यांचीही तुला करीत. उदाहरणार्थ जहांगीरनें एकदां त्याचा दरबारी वैद्य रूहुल्लाह याची रौप्यतुला केली आणि तुळेची रक्कम त्यास देऊन वर तीन गांवेंही इनाम करून दिलीं. हें सर्व फी म्हणून त्यास देण्यांत आलें (तुझुक–इ–जहांगीरी पृ. १६३,१६९,१७०,२७६, १८३).

शाहजहाननें तुळेच्या पद्धतींत किंचित् बदल केला. कोणत्याही तुलाप्रसंगीं तो प्रथम सुवर्णतुला करी आणि नंतर इतर पदार्थांनीं तुला होई. पुढें हे पदार्थ बादशाह आधिव्याधीपासून दूर रहावा म्हणून दरबारी, धार्मिक प्रवृत्तीचे लोक व भिकारी यांस वाटले जात (आईन–इ–अकबरी ब्लोकमान खंड १, पृ. २६६).

औरंगजेब गादीवर आल्यानंतर पहिलीं अकरा वर्षें शम्सी व कम्री अशा दोन्ही प्रकारच्या तुला होत. याप्रमाणें त्याच्या अकराव्या राज्यवर्षीं ५१ वी शम्सी व ५२ वी कम्री अशा दोन्ही तुला झाल्या. पण एव्हां ही पद्धति हिंदू आहे असें त्याच्या ध्यानांत आल्यामुळें पुढल्या वाढदिवसापासून त्यानें हा तुलाविधि करण्याचें बंद केलें. (आलमगीरनामा पृ. २३९; औरंगजेबनामा भाग २, पृ. १२)

मोगलाईच्या ऱ्हासकालांत दिल्लीच्या आसमंतांत पुनः हिंदू संस्कृतीचा जोर झाला होता. तेव्हां बादशाही कुटुंबांत किंवा एकंदर मुसलमानी अमदानींत देखील हिंदू संस्कृतीचा परिणाम झालेल्या मुसलमानी कुटुंबांत तुलादानें झालीं असणें शक्य आहे. पण त्यांचे निर्देश मला अजून मिळाले नाहींत. अगदीं अलीकडे मात्र ना. आगाखान यांच्या अनुयायांनीं मुंबई येथें ता. ११।१।१९३६ व १०।३।१९४६ रोजीं त्यांच्या अनुक्रमें सुवर्ण व हीरकतुला केल्या.



कुंभकोणम् (तंजावर) – महामखम् पुष्करणीजवळ असलेल्या मंडपांतील तुलाभाराचें शिल्प (पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या कृपेनें)